


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

त्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २६२ वा | शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# या भ्रष्टाचाऱ्यांची पोलीस महासंचालकांकडे तक्रार!

**जनसंचलन/बुलढाणा**

सडेतोड वृत्त छापलं आणि एका जिल्हा सामान्य रुग्णालयातील कंत्राटदारावर थेट गुन्हा दाखल झाला.आता या कंत्राटदाराने एक युक्ती योजली असून,आरोग्य विभाग , सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्राम सडक योजना विभाग, आणि महसूल विभाग तसेच जिल्हा परिषद यासह सहकार विभागातील भ्रष्टांनी एकत्र येऊन सदर पत्रकाराला कोणतत्याही गुन्ह्यात अडकवूच असा प्रण घेतल्याची माहिती आहे.पण घाबरणार ते पत्रकार कसले? याबाबतची तक्रार पोलीस महासंचालकांना देण्यात आली आहे. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो, लोकशाहीला अधिकाधिक बळकट करण्यासाठी पत्रकारिताही तेवढीच प्रामाणिक,निर्भीड व सर्वात महत्वाचे म्हणजे नि:पक्षपाती असायला हवी,या दृष्टिकोनातून एका बड्या पत्रकाराने सर्वच विभागातील भ्रष्टाचार गेल्या काही दिवसात वृत्त प्रकाशित करून बाहेर काढले आहे. दरम्यान त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार असून, आता या महाप्रतापींनी गुंडशाहीचा मार्ग अवलंबला आहे.सदर पत्रकार यांना सोशल माध्यमातून जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या.खोट्या प्रकरणात अडकवण्याचाही प्रयत्न सुरू आहे. पत्रकार तीस वर्षापासून निर्भीड व पारदर्शीपणे पत्रकारिता करीत असून आता त्यांच्या कुटुंबीयांना धोका निर्माण झाला आहे.विशेषता आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधानमंत्री मुख्यमंत्री ग्राम सडक योजना विभाग, आणि महसूल विभाग तसेच जिल्हा परिषद व सहकार विभागातील भ्रष्टाचारी एकत्रित आलेत. त्यांनी सत्याचा गळा घोटण्याचा प्रयत्न सुरू केला असून, तशा हालचाली जाणवत असल्याने याप्रकरणी पोलीस महासंचालकांना तक्रार देण्यात आली आहे.जिल्हा पोलीस यंत्रणा सजग आहे त्यामुळे या भ्रष्टांचे मनसुबे उधळून लावू असे पोलीस यंत्रणेने आश्वासित केले आहे.



# टॅक्स न भरणे गाळेधारकांना अंगलट !

## कृषी उत्पन्न बाजार समितीतील ३० गाळे सील!



**जनसंचलन/ सोयगाव**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिपत्याखालील गाळ्यांवर आज मोठी कारवाई झाली.बांधकामाची परवानगी न घेणे,नोंदणी न करणे आणि विशेष म्हणजे टॅक्स न भरणे गाळेधारकांना अंगलट आले आहे. ३० गाळे सील केले असून,तब्बल ४७ लाख रुपयांचा टॅक्स थकीत असल्याने ही कारवाई नगरपालिकेने केली आहे. नगरपालिकेच्या हद्दीत कृषी उत्पन्न बाजार समितीतील गाळे बांधण्यात आले आहे.५१ जुने गाळे तर ३६ नवीन गाळे बांधण्यात आले. गाळेधारकांनी रीतसर नगरपालिकेची नोंदणी करणे आवश्यक आहे शिवाय बांधकामाची परवानगी घेणे आवश्यक आहे परंतु नगरपालिकेच्या नियमाला बगल देऊन गाळेधारक आपल्या मर्जीत वागत होते. दरम्यान नगरपालिकाचे सीओ पांडे यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.या कारवाईत कृषी उत्पन्न बाजार समितीमधील ३० गाळे सील करण्यात आले.तर उर्वरित गाळेधारकांना नोटीस बजावण्यात आली आहे .पुढील गुरुवारपर्यंत ४७ लाख रुपयांची थकीत रक्कम अर्थात टॅक्स यांना भरावा लागणार आहे. त्यामुळे नगरपालिकेचे कारवाईची गाळधारकांनी धास्ती धरली आहे.

# तो विकत होता कामोत्तेजक औषधी!

**जनसंचलन/बुलढाणा**

मेडिकलला परवाना मिळाला म्हणजे कोणत्याही औषध-गोळ्या सर्रास विकाव्या,असा नियम नाही.परंतु लोणार येथील सुशील पूनमचंद दरोगा यांच्याकडून नमुना १६ पंचनाम्यातर्गत एकूण २४.३३ लाखांचा औषध साठा जप्त करण्यात आला आहे.विशेष म्हणजे चंदन मेडिकल स्टोअर्स लोणार येथून एकूण ८२२५ रुपयांची १०० ही कामोत्तेजक औषधी जप्त करण्यात आली आहे.दरम्यान मेडिकल मधून गर्भपात करणाऱ्या व नशेच्या गोळ्या विकल्या जात असल्याचे शिक्कामोर्तब होत असून,अन्न औषध प्रशासनाने आज मोठी कारवाई केली. सहायक आयुक्त (औषधे) अन्न व औषध प्रशासन म.राज्य, बुलढाणा कार्यालयातील औषध निरीक्षक, गजानन प्रल्हाद घिरके यांना लोणार येथे अवैधपणे औषध साठवणूक केल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्या आधारे एम.व्ही. गोतमारे, औषध निरीक्षक अन्न व औषध प्रशासन म.राज्य वाशिम यांच्या समवेत १९ डिसेंबर रोजी मौजे लोणार येथे चंदन मेडीकोजचे मागे रुम क्रमांक १,बस स्टँड जवळ, लोणार येथे तपास चौकशी केली असता सदर जागेत विनापरवाना औषधी साठवणूक केल्याचे आढळून आल्याने सुशिल पुनमचंद दरोगा हजर व्यक्ती यांच्याकडून नमूना १६ व पंचनामा अंतर्गत एकूण २४.३३ लक्ष रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.सदर औषध नमूना विश्लेषणासाठी घेण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. तसेच चंदन मेडीकल स्टोअर्स, लोणार येथे तपासणीस्तव भेट दिली असता त्यांच्याकडे कामोत्तेजक औषधी (-१००) आढळून आल्याने रुपये ८२२५ रुपयांचा साठा प्रतिबंधीत करण्यात आला आहे.उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियमांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# समृद्धी लगत ४५ कि.मी.चे शेतरस्ते

जनसंचलन/मेहकर

समृद्धी महामार्गामुळे दळणवळणाची नागरिकांसाठी चांगली सुविधा निर्माण झाली असली तरी दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. आतापर्यंत ४५ किलोमीटर लांबीचे शेतरस्ते आता पूर्ण झाले असून, त्याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होताना दिसत आहे. हजारो कोटी रुपये खर्चुन बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण होत आले आहे. महामार्गात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर जमिनींचे अधिग्रहण करण्यात आले. परंतु अतिशय महत्त्वाच्या असलेल्या समृद्धीचे काम होत असताना दुसरीकडे दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांचे जुने शेतरस्ते नेस्तनाबूत झाल्याने विविध कामांसाठी शेतात जाण्याकरिता शेतकऱ्यांना रस्तेच उरले नव्हते. त्यामुळे या प्रश्नासाठी शेतकरी संघर्ष समितीने विविध आंदोलने केली. माजी आमदार संजय रायमुलकर यांनी विधानसभेत या प्रश्नावर अनेकदा आवाज उठवला. मुख्यमंत्री व संबंधित मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला. स्वतः रायमुलकर यांनी राज्य रस्ते विकास महामंडळाच्या कार्यालयासमोर उपोषणही केले होते. त्यामुळे आता माजी आमदार रायमुलकर यांच्या प्रयत्नातून ४५ किमी शेतरस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे, शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# ५०६ महिलांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया...

जनसंचलन/मेहकर



तालुक्यातील डोणगाव, जानेफळ, कळमेश्वर आणि देउळगाव साकर्षा या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ दरम्यान ५०६ महिला आणि दोन पुरुषांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करण्यात आली. या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध शिबिरांचे आयोजन करून या शस्त्रक्रीया करण्यात आल्या या प्राथमिक आरोग्य केंद्रांना ८६० शस्त्रक्रीयांचे उद्दीष्ट होते. आरोग्य विभागाकडून नियमीत शिबीरे घेतली

# बसमध्ये चढताना महिलेचे दागिने केले लंपास



जनसंचलन/बुलढाणा

येथील बसस्थानकावर बसमध्ये चढतांना एका महिलेच्या पर्सधील सोन्याचे ३६ हजार रुपये किंमतीचे दागिने अज्ञात तीन महिलांनी लंपास केल्याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १९ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्यासुमारास घडली. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील आन्वा येथील प्रती बडगावकर या बसस्थानकावर मोताळ्याला जाण्यासाठी मध्यप्रदेश परिवहन निगमच्या बुऱ्हाणपूर बसमध्ये चढल्या. यादम्यान तीन बुरखाधारी महिलांनी त्यांच्या पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे ३६ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. बुलढाणा शहर पोलिस गुन्हा दाखल करण्यात आला.

# गो. से. महाविद्यालयात बौद्धिक संपदा अधिकार व पेटंट शोध या विषयावर विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा

जनसंचलन/ खामगाव ड



विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव, द्वारा संचालित गो. से. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथे दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी बौद्धिक संपदा अधिकार व पेटंट शोध या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेला प्रमुख व्यक्त्या ॲड. योगिता पडोळे, संचालक लॉक युअर आयडिया प्रा. ली. पुणे ह्या होत्या. गो. से. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी अध्यक्षपद भूषविले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. उबाळे व संगणक विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. ई. अजमिरे उपस्थित होते. प्रा. डॉ. पी. ई. अजमिरे यांनी प्रास्ताविकेतून कार्यशाळा आयोजनाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. आजच्या वेगाने विकसित होत असलेल्या शैक्षणिक आणि संशोधनाच्या क्षेत्रामध्ये , बौद्धिक संपदा ही एक महत्त्वाची संपत्ती बनली आहे तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये, आयपीआर समजून घेणे हे आवश्यक आहे असे मत उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. उबाळे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी मांडले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रामध्ये मार्गदर्शिका ॲड. योगिता पडोळे यांनी आयपीआरची मूलभूत तत्त्वे आणि त्याची शैक्षणिक आणि संशोधनातील प्रासंगिकता तसेच शैक्षणिक आणि संशोधना मध्ये आपले हक्क व अधिकार हे कॉपीराईट व आईपीआर च्या माध्यमातून कसे जोपासावे या विषयी विस्तृत असे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये आधुनिक साधने आणि डेटाबेस वापरून प्रभावी पेटंट शोध कसा घ्यावा याचे प्रात्यक्षिक सहभागींना दिले. प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी शेवटच्या समारोपीय सत्रामध्ये बौद्धिक संपदा अधिकार व पेटंट शोध चा उत्कृष्ट उपयोग करून शैक्षणिक व संशोधना मध्ये नाविन्यपूर्ण बदल घडवावा व त्याचा विद्यार्थी आणि समाजासाठी कसा उपयोग होईल यासाठी प्रयन्त करावेत असे सर्व सहभागींना आव्हाहन केले. सदर कार्यक्रमाला ५५ प्राध्यापक, संशोधन व पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या इनोवाशन, इनक्युबेशन व इनोव्हेशन इनक्युबेशन आणि उद्योजकता सेल चे समन्वयक प्रा. रवींद्र चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात प्रा. डॉ. अरविंद तायडे, प्रा. डॉ . दीपक नागरीक , प्रा. डॉ . निता बोचे व प्रा. ईश्वर कराळे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. धनश्री मिश्रा, कू. राजनंदिनी राठोड व हिमांशू राठी यांनी केले तर प्रा. डॉ . रोहिणी धरमकार यांनी उपस्थितांचे आभार मानले.अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# क्रीडा महोत्सवात मेहकर पालिका अव्वल विविध स्पर्धांमध्ये चमकले

जनसंचलन/मेहकर

जिल्हा पातळीवर नगर परिषद कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. तीन दिवसीय जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हा सह नगरपालिका प्रशासनामार्फत आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मेहकर नगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट प्रदर्शन केले. १०० मीटर धावणे ४०० मीटर रिले, ३किमी चालणे, पोहणे, चेस, भालाफेक, गोळा फेक, क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ असे विविध प्रकारांमध्ये सहभागी खेळाडू संतोष राणे, सुधीर सारोळाकर, श्रीकृष्ण जैवाळ, विशाल शिरपूरकर, गणेश डोंगरे, प्रियांका सुरवसे, प्रगती काळे, अमिता कळसकर, पूजा जेउघले, ऋषी पंडित सारंग काळदाते, विजय दराडे यांनी मेहकर नगर परिषदकडून प्रथम, द्वितीय व तृतीय असे क्रमांक मिळवत न.प. मेहकरचे नाव उंचविण्याचा बहुमान मिळवला. समारोपीय कार्यक्रमाला अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी शेलार, जिल्हा सह आयुक्त गंगाधर पेंटे, मुख्याधिकारी गणेश पांडे, मुख्याधिकारी बोबडे, मुख्याधिकारी डॉ. जयश्री काटकर बोराडे, जिल्हा क्रीडा अधिकारी व इतर अधिकाऱ्यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# लोणार येथे अवैध औषधसाठा जप्त...

जनसंचलन/बुलढाणा

अन्न व औषध प्रशासनाच्या मार्फत लोणार येथे अवैध औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील औषध निरीक्षक गजानन प्रल्हाद घिरके यांना लोणार येथे अवैधपणे औषध साठवणूक केल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्या आधारे औषध निरीक्षक एम.व्ही. गोतमारे, अन्न व औषध प्रशासन, वाशिम यांच्या समवेत दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी मौजे लोणार येथे चंदन मेडीकोजचे मागे रुम क्रमांक १, बस स्टँड जवळ, लोणार येथे तपास चौकशी केली असता सदर जागेत विनापरवाना औषधी साठवणूक केल्याचे आढळून आल्याने, सुशिल पुनमचंद दरोगा हजर व्यक्ती यांच्याकडून नमूना १६ व पंचनामा अंतर्गत एकूण २४.३३ लक्ष चा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर साठयातून औषध नमूना विश्लेषणासाठी घेण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. चंदन मेडीकल स्टोअर्स, लोणार येथे तपासणीस्तव भेट दिली असता त्यांच्याकडे कामोत्तेजक औषधी (-१००) आढळून आल्याने रुपये ८ हजार २२५ रुपये चा साठा नमूना १५ दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी प्रतिबंधीत करण्यात आला आहे. झोपेच्या गोळया, गर्भपाताची औषधे तसेच नशा येणारी औषधे व सर्व ॲलोपॅथीक औषधे त्यांनी कोणत्याही परीस्थितीत डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय ग्राहकांना देवू नयेत, तसेच प्रत्येक औषधाचे औषध विक्री बिल ग्राहकांना देण्यात यावे अशा प्रकारचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियमांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. असा इशारा जिल्हयातील सर्व मेडीकलधारकांना देण्यात आला आहे. बुलढाणा जिल्हयातील नागरीकांनी कुठलीही ॲलोपॅथीक औषधे विना प्रिस्कीपशन डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नयेत. स्वत:च्या मनाने औषधे घेतल्याने शरीरावर दुष्परीणाम होतात असे आवाहन सहायक आयुक्त (औषधे) गजानन प्रल्हाद घिरके, अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा यांनी केले आहे.

# जनता विद्यालयामध्ये प्रकृती प्रशिक्षण अभियान

जनसंचलन/ पिंपळगाव सराई

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने १८ डिसेंबर रोजी जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पिंपळगाव सराई येथे देश का प्रकृती परिक्षण अभियान बुलढाणा येथील ए.एस. पी. एम आयुर्वेद मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. रामेश्वर उबरहंडे यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आले. याप्रसंगी ए.एस.पी.एम आयर्वेद वसे हे त्यांच्या डॉक्टरांच्या चमूसह उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद ठोंबरे होते याप्रसंगी प्रा.डॉ. भागवत वसे यांनी अभियान संदर्भात विद्यार्थ्यांना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना डॉ. भागवत वसे यांनी आयुर्वेदाचे महत्त्व विषद केले विद्यालयातील परिपाठ पाहून डॉक्टरांनी कौतक केले.

# निंबा परिसरात बिबट्याचा वावर !

## वनविभागाने राबवली शोध मोहीम

जनसंचलन/मेहकर

घाटबोरी वनपरिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या निंबा बिट परिसरात दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर आहे. बिबट काही शेतकऱ्यांना आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बिबट्याच्या शोधासाठी वनविभागाच्या पथकाने १६ डिसेंबर रात्री मोहीम राबविली. घाटबोरी वनपरिक्षेत्रांतर्गत निंबा बीटमध्ये शेतकरी कैलास ढोणे, दिलीप वानखेडे यांच्या शेतात दि. १६ डिसेंबर रोजी रात्री ७:३० वाजतादरम्यान तुरीच्या शेतात लहान मोठे बिबट आढळले. परिसरातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली आहे. महावितरणकडून वारंवार तीचपरनका संदित होत असल्याने नाटी शेतकऱ्यांना रात्री जागल करावी लागत आहे. गहू, हरभरा पिकाला पाणी देताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. शेतकऱ्यांना रात्री रोही, रानडुक्कर आदी प्राण्यांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी जीव धोक्यात टाकावा लागत आहे. अशातच बिबट सारखे हिंस्र प्राणीही आढळल्याने निंबा परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या बिबट्याचा वनविभागाने तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. परिसरात बिबट असल्याची माहिती मिळताच निंबा बीटचे वनरक्षक डी. एस. पवार यांनी पथकासह शोध घेतला आहे. परंतु बिबट दिसून आला

# शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी स्वाभिमानीचा रास्ता रोको...

## टेंभूर्णा येथे वाहतूक ठप्प कार्यकर्ते, शेतकऱ्यांचा सहभाग

जनसंचलन/ खामगाव

कापसाला बारा हजार रुपये तर सोयाबीनला आठ हजार रुपये क्विंटल बाजारभाव देण्यात यावा, यासह शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने गुरुवारी टेंभुर्णा येथे रास्ता आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्येत वाढ होत असल्याचा दावा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे. रास्तारोको आंदोलनात सहभागी शेतकरी व स्वाभिमानीचे पदाधिकारी. थांबविण्यासाठी तसेच शेतमालाला बाजारभाव देण्यासाठी गुरुवारी स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांच्या नेतृत्वात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात तालुका अध्यक्ष गोपाल जुमडे व युवक तालुकाध्यक्ष कपिल सिंह पवार, योगेश घोंगे, प्रतीक जुमळे, आकाश जुमळे, अनंता घोंगे, अंकित घोंगे, शरद पवार, भूषण पवार, कृष्णा वरखडे, आकाश घोंगे, अमरदीप तायडे, शेख जुमळे, मनोज इंगळे, प्रशिक तायडे, गणेश नागे, अतीत शेख कदीर आदींचा सहभाग होता.

# परभणी घटनेतील आरोपीवर कारवाई करण्याची मागणी

जनसंचलन/ वरवट बकाल

परभणी घटनेतील आरोपीवर कठोर कारवाई करा, अशी मागणी भारतीय बौद्ध महासभा संग्रामपूर तालुका शाखेच्या वतीने करण्यात आली. गुरुवारी तहसीलदारांमार्फत राज्यपाल यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये त्या घटनेची सीबीआय चौकशी लावून मास्टरमाइंड व्यक्तीचा शोध घ्यावा, दोषींवर कारवाई करावी, यासाठी राज्यभर आंदोलन होत आहे. आंदोलन करणाऱ्या लोकांना द्वेष भावनेतून मारहाण केली जात आहे, याची चौकशी करावी, बौद्ध समाजावर द्वेष भावनेतून केल्या जात असलेल्या कारवाया थांबवाव्या, त्यांच्यावर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावे, निवेदनावर भाऊराव गवांदे, राहुल नितने, गजानन खंडेराव, अजय वानखडे, उत्तम उमाळे, रमेश ऑकार इंगळे, रामराव तायडे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य मिलिंद वानखडे, रवी पहुरकर, उदेभान दांडगे यांच्या सह्या आहेत.

# चीनी मांजा विरोधात पक्षी, वन्यजीव आणि मानसासाठी सरसावले वन्यजीव सोयरे

जनसंचलन/बुलढाणा

वन्यजीव सोयरे बुलडाणाकडून दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी बुलडाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मकर संक्रांतीच्या निमित्ताने चीनी मांजा वापरून उडविण्यात येणाऱ्या पतंगांमुळे दरवर्षी हजारो पक्षी, वन्यजीव आणि मानसे जखमी होतात. राज्य सरकारने चीनी मांजावर कायद्याने बंदी आणली असली, तरी बाजारात सहज उपलब्ध असलेल्या या मांजामुळे दर वर्षी पक्ष्यांना वन्यजीवांना आणि मानवाला प्राण गमवावे लागतात. यावर्षी सुध्दा येणाऱ्या संक्रांती सणानिमित्याने बालगोपाल तसेच अनेक पतंगप्रेमी मोठ्या प्रमाणात पतंगबाजी करत असतांना कळत नकळत चीनी मांजाचा उपयोग करतील. हा मांजा मोठ्या वृक्षांना, इलेक्ट्रिक तारांना, टेलीफोन, दुरदर्शनच्या केबल्सना अडकतो आणि त्यात अनावधानाने पक्षी, वन्यजीव आणि माणसे अडकतात आणि त्यात जखमी होतात किंवा त्यांचा जीव जातो. आपणास नम्र विनंती की, कृपया शहरातील व जिल्ह्यातील पतंग मांजा विक्रेत्यांनी हा मांजा विकू नये यासाठी आपण परिपत्रक काढून विक्रेतांना हा मांजा विकु नये यासाठी तसेच पतंगप्रेमींनी हा मांजा विकत घेऊ नये म्हणून सूचित करावे. तसेच आपल्या विभागाच्या मदतीने या मांज्याच्या विक्रीवर प्रतिबंध घालावा तसेच योग्य ती कारवाई करावी, ही नम्र विनंती निवेदना द्वारे करण्यात



आली आहे. निवासी जिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे मैडम यांनी वन्यजीव सोयरे शाम राजपुत, प्रशांत राऊत, श्रीकांत पैठणे, अक्षय निकम, गणेश श्रीवास्तव, विशाल ढवळे आणि नितिन श्रीवास्तव यांच्याकडून निवेदन स्विकारले. पतंग उडवतांना कृपया चीनी मांजा वापर करून पतंग उडवू नये असे आवाहन वन्यजीव सोयरे बुलडाणा यांच्याकडून करण्यात आले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# घरफोडीचा कर्दनकाळ जानेफळ येथून अटक स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई!

## ऑक्सिजन सिलेंडर ते गनपर्यंत मोठ्या प्रमाणात जप्ती!

जनसंचलन/मेहकर

घरफोडी, चोऱ्या, याचे प्रमाण सध्या चांगलेच वाढले आहे. पण याला आळा सुद्धा कसा घालायचा याची चाबी पोलिसांच्या हातात आहे. अनेक ठिकाणी घरफोड्या, दरोडा, लुटमार, करण्याच्या घटना जिल्ह्यात घडल्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने याचा शोध लावायचा असा जंगच बांधला आहे. त्या अनुषंगाने विविध ठिकाणी बुलढाणा जिल्ह्यात नव्हे तर बाहेरील जिल्ह्यातही घर फोडी करणारा अट्टल आरोपी याचा शोध पोलिसांनी घेतला आहे. संशयित आरोपी हरिंदर सिंग संतोष सिंग दुधानी वय २३ वर्ष रा. शेंदला तालुका मेहकर याला जानेफळ येथून १८ डिसेंबर रोजी अटक करण्यात आला आहे. या आरोपीकडून ऑक्सिजन सिलेंडर, सिंगल बॅरल भरमार गन, तलवार, कटर दोन, चाकू, कोयता दोन, सिलेंडर, व चोरी करण्याच्या साहित्यासह,इ इ सी ओ कारसह एकूण ५ लाख ते ३३ हजार ७७० रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एआरएम ॲक्ट प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. आरोपी यांनी मेहकर ३, चिखली २, शेगाव १, जानेफळ १, अकोला १, वाशिम १, या ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. त्याला साथ देणारे दोन जण असून ते फरार त्याचा शोध पोलीस घेत आहे. ही कार्यवाही माननीय पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक बुलढाणा, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक लांडे, यांच्या आदेशाने सचिन कानडे, प्रताप बजाड, राजकुमार राजपूत, शरद गिरी, दिनेश बकाले, दिगंबर कपाटे, पुरुषोत्तम आघाव, वैभव मगर, दीपक वायाळ, पूजा साळवे, रवी भिसे व आदी सहकार्यांने केली असून, घरफोडीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास पोलीस करीत आहे.

# श्रीमत देशमुख याचे सुयश

जनसंचलन/बुलढाणा



आता नुकेच विश्वविजेता गुकेश डोम्मा राजू यांची सर्वात युवा विश्वविजेता म्हणून घोषित झाले, पोदार् इंटरनेशनल स्कूल चे विधार्थी श्रीमत सुशीलराजे देशमुख हे शालेय सामूहिक क्रीड़ा सप्ताह मद्धे चेस या खेळात पहिले आले आहेत इयत्ता २ मध्ये शिकणारा श्रीमत देशमुख हा सामना प्रथम क्रमांकन मिळून विजयी झाले आहेत श्रीमत देशमुख हे बुलढाणा मधील नामांकित बिजनेस मन डॉक्टर सुशीलराजे देशमुख यांचे चिरंजीव आहेत श्रीमत हा पोदर इंट्रनेशनल ला शिकत् आहे तो त्याचा आई वडील सोबत चेस खेळून शिकला आहे इयता २ री मधील मुलगा वय वर्ष ८ आणी इतकी भरारी घेऊन मोठे यश प्राप्त केले त्या साठी त्याची सर्व समूहातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे आणि भावी जीवनासाठी आशिर्वाद मिळत आहेत

# गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ.आंबेडकर यांच्या बद्दल केले अपमानकारक विधान!


जनसंचलन/चिखली




गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरां बद्दल अपमानकारक विधान केल्यामुळे समाज बांधवांनी जेलभरो सत्याग्रह आंदोलन केले. चिखली तालुक्यातील आंबेडकरी समाज बांधवांनी आज १९ डिसेंबर रोजी जयस्तंभ चौकात सामूहिक सत्याग्रह आंदोलन छेडले. यावेळी सम्राट अशोक-फुले-शाहू-आंबेडकर वाटिकेत शहीद सोमनाथ सूर्यवंशी व लोकनेते विजय वाकोडे यांना श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन सभा पार पडली. यानंतर आंदोलनकर्त्यांनी जेल भरो सत्याग्रह जन आंदोलन सुरू केले.चिखली पोलिसांनी या आंदोलनात सहभागी असलेल्या सर्व आंबेडकरी समाज बांधवांना स्थानबद्ध केले, तरीही त्यांनी आपल्या मागण्या तशाच कायम ठेवल्या. आंदोलनकर्त्यांनी गृहमंत्री अमित शहांच्या वादग्रस्त विधानाचा तीव्र निषेध केला. अमित शहा यांनी लोकसभेत आंबेडकरांबद्दल केलेले ङ्कङ्कआंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, ये बोलना अब फॅशन हो गयाङ्कङ्क हे विधान समाज बांधवांनी दुर्लतेचे आणि आंबेडकरांचा अवमान करणारे ठरवले. यावरून गृहमंत्र्याच्या माफीची मागणी करण्यात आली. आंदोलनात आंबेडकरी समाजाने परभणी जिल्ह्यातील हिंसाचार, खोटी गुन्हे आणि शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनासंबंधी सरकारला मागणी केली.आंदोलनकर्त्यांनी सरकारला शहीद सूर्यवंशी कुटुंबाला न्याय मिळवून देण्याची तसेच दोषी पोलिस अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर करून, दोषींवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची विनंती केली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी, ङ्कङ्कशहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला शासनाने पुनर्वसन दिले नाही, तसेच गृहमंत्री अमित शहा यांनी आंबेडकरांबद्दल केलेल्या अपमानकारक विधानाबद्दल माफी मागावीङ्कङ्क असे ठामपणे सांगितले. आंदोलनकर्त्यांनी, ङ्कङ्कजर सरकारने या मागण्या मान्य न केल्यास, विधानसभा अधिवेशनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर मोर्चा काढण्यात येईलङ्कङ्क असा इशारा दिला. या निवेदनावर भाई प्रदीप अंभोरे, संजय वाकोडे, भाई छोटू कांबळे, प्रशांत डोंगरदिवे, मधुकर मिसाळ, सिद्धार्थ पैठने, अर्जुन बोर्डे, दीपक कस्तुरे, मनोज जाधव, भारत जोगदंडे, भीमराव खरात, हिम्मतराव जाधव, प्रकाश बनकर, दीपक साळवे, संघमित्रा कस्तुरे, मंदाबाई आराख, रेखा चव्हाण, हिम्मतराव जाधव, राजेंद्र सुरडकर यांच्यासह अनेक समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या असून, त्यांच्या एकजूटाने आंबेडकरी समाजाचा संघर्ष आणखी तीव्र होईल, असे सूचित केले आहे.

# रात्र आपलीच आहे!...

# चिखली तालुक्यातील कव्हळा येथे बिबट्याचे वावर



जनसंचलन/चिखली

चिखली तालुक्यातील कव्हळा येथे कधी कोणाची आणि कशी शिकार होईल? त्याचा नेम राहिला नाही.रात्र आपलीच आहे! या अविर्भावात येथे बिबट्या वावरत आहे. त्यामुळे शेती कशी करायची? असा प्रश्न निर्माण झाला असून शेतमजुरांना पोट भरण्यासाठी जीव मुठीत धरावा लागतोय.अशी गंभीर परिस्थिती असली तरी यंत्रणा मात्र मूग गिळून आहे. बिबट्याने एखादा बळी घेतल्याची वाट तर यंत्रणा पाहत नाही ना? असा प्रश्न उपस्थित होतोय. बिबट्यांच्या भौगोलिक स्थानांवरील माणसांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे अलीकडील काळात बिबिट्या निघण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. चिखली तालुक्यातील कव्हळा परिसरातील पाळीव जनावरे, तसेच मानवी वस्तीमध्ये बिबट्याने शिरकाव केल्यामुळे मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याला जेरबंद करून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात यावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.बिबट्याचा मानवी वस्तीत शिरकाव झाल्याने हल्ले वाढण्याची दाट शक्यता आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी अनेक शासकीय नियमावली आहेत. तर दुसरीकडे गावांच्या हद्दी विस्तारत असल्याने ऊस, मका यासारख्या पिकांच्या क्षेत्रात मिळणारी लपण यामुळे निवा-यासाठी मानवी वस्तीकडे हे बिबटे धाव घेत आहेत. याशिवाय शेतीच्या परिसरातील पाळीव प्राणी, डुकरे यासारख्या प्राण्यांमुळे त्यांच्या भक्ष्याचीही सोय होत असल्याने बिबटे या परिसरात निघाल्याच्या घटना घडत आहेत. कव्हळा परिसरात सध्या बिबट्याची दहशत वाढत असून,हा बिबट्या रात्री कुणाची शिकार करेल हे सांगता येत नाही.त्यामुळे संबंधित यंत्रणेने नागरिकांच्या सुरक्षेसाठी पावले उचलावीत अशी मागणी केली जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958